# प्रकरण - सातवे

## उपसंहार

## प्रकरण - सातवे

## उपसंहार

मराठी कथावाङ्मयाला स्वतःचा असा फार मोठा इतिहास लाभला आहे तसेच त्याला वैभवशाली परंपराही लाभली आहे असे म्हणतानाच त्याच्या उदयापासून ते त्याच्या द·ता·भोसलेंपर्यंतच्या वाटचालीचा मागोवा घ्यावा लागतो· हा मागोवा घेत असतानाच मराठी कथावाड्मयाचे मूळ हे थेट भारतीय कथावाङ्मयाच्या मूळापर्यंत जाते· अर्थातच ऐकिव तथा अलिखित स्वरूपाच्या मराठी कथावाङ्मयाचा जन्म अगदी प्राचीन काळाशी नाते सांगतो· तरीही लिखित स्वरूपातील मराठी कथावाङ्मयाच्या दृष्टीने तेराव्या शतकातील विष्णुशर्म्या चे "पंचतंत्र" हे मराठी कथावाङ्मयाचे मूळ ठरते· इथपासून म्हणजेच त्याच्या उदयापासून ते पुढच्या विविध कालखंडात उत्तरोत्तर त्याचे स्वरूप बदलत गेल्याचे आणि त्याला विकासगर्भ रूप प्राप्त झाल्याचे दिसून येते·

अशा पध्दतीने त्याच्या स्वरूप, वाटचाल व विकासाचा परामर्श घेत असताना त्याचे मुख्यतः दोन विभाग पाडावे लागतात· त्यापैकीच, एकूण कथा-वाङ्मयाच्या अनुषंगाने आणि ग्रामीण कथावाङ्मयाच्या अनुषंगाने मराठी कथावाङ्मयाचा उदय-वाटचाल व विकास-होय· अर्थातच या दोन्ही विभागातील काही प्रमुख कथाकारांचा आणि त्यांच्या कथावाङ्मयाचा ओझरता आढावा घेत असतानाच, मराठी कथावाङ्मयाबरोबरच ग्रामीण तथा प्रादेशिक कथावाङ्मयालाही स्वतःचा असा फार मोठा इतिहास आणि दीर्घ अशी परंपरा लाभल्याचे दिसून येते· विशेषत्वाने ग्रामीण कथेच्या इतिहासावरून आणि लेखकांच्या दीर्घ परंपरेवरून नजर टाकल्यानंतर तिच्या वैभवशालीत्त्वाची व तिच्या स्वरूप-विषय व आशय वैविध्यतेची साक्ष पटते·

"प्रादेशिक" या संकल्पनेचा प्राथमिक विचार करताना "ग्रामीण" आणि "प्रादेशिक" या दोहोंचाही विचार करणे क्रमप्राप्त ठरते. कारण "ग्रामीण" आणि "प्रादेशिक" हे एकच? की भिन्न? याबाबत गोंधळाची स्थिती निर्माण झालेली दिसते. म्हणजेच कधी-कधी ते दोन्ही एकच आहे असे म्हटले जाते. कारण त्या दोहोंत भेदांपेक्षा साम्यच अधिक आढळते. परंतु एका विशिष्ट मर्यादेपलीकडे जाऊन ते दोन्ही एकच आहे असे म्हणता येत नाही. तथापि ते दोन्ही भिन्न आहे असे मानणारा नाही ते नेमके कितपत भिन्न ठरते? हे यथार्थपणे दाखवून देता आले नाही. किंबहूना ते दोन्ही भिन्न आहे असे सांगताना सुध्दा काही गैरसमज उद्भवलेले दिसतात. त्यांपैकीच कोकणचे ते प्रादेशिक आणि इतर प्रांतीय ते ग्रामीण, कादंबरी तेवढी प्रादेशिक व कथा निव्वळ ग्रामीण - अशाप्रकारचे हे गैरसमज होत. परंतु खरे पाहता कोणत्याही प्रदेशातील आणि कोणत्याही वाङ्मयप्रकारातील ग्रामीण साहित्याने प्रादेशिक घटकांना अनुसरून तसा आविष्कार घडविल्यावर, त्या साहित्याला प्रादेशिक हे नामाभिधान प्राप्त होऊ शकते हेच खरे.

"ग्रामीण" आणि "प्रादेशिक" यातील काही साम्य हे दुय्यम तथा गौण ठरले तरीही काही साम्य हे मुलभूत ठरते. त्या दोहोंचा उदयकाल (1925 साल) व त्यांची एकस्वरूपी अभिव्यक्ती आणि प्रेरणा हे साम्य दुय्यमही ठरेल. परंतु, त्या दोहोंचा जन्मदात्रा ग्रामीण भू-प्रदेश, त्या दोहोंच्या निर्मितीमागील लेखकांची जाण आणि ग्रामीण मातीचेच ऋण हे साम्य मात्र मुलभूत ठरते. या मुलभूत साम्यामुळेच एका विशिष्ट मर्यादेपलीकडे जाऊन ते सर्वस्वी भिन्न आहे असे म्हणता येत नाही. तरीसुध्दा ते दोन्हीं सर्वस्वी भिन्न आहे अशी भूमिका आज अखेर बलवत्तर झालेली दिसते. कारण विशिष्ट प्रदेशातील भौगोलिकता, निसर्ग, संस्कृती, सामुहिकता, सामाजिकता, बोलीभाषा आणि तेथील समस्या ही प्रादेशिक साहित्याची घटकतत्त्वे, ही ग्रामीण साहित्याच्या घटकतत्त्वांच्या तुलनेत सर्वस्वी भिन्न ठरतात असे म्हटले जाते. परंतु या दोन्ही साहित्यांची आविष्कार वैशिष्टये सर्वस्वी भिन्न ठरतात का? हे मात्र कोणासही दाखवून देता आले नाही. आणि येणारही नाही. कारण प्रादेशिक साहित्यातील संस्कृती, सामाजिकता, सामुहिकता आणि बोलीभाषा ही ग्रामीण साहित्यातील

संस्कृती, सामाजिकता, सामुहिकता आणि बोलीभाषा यांपेक्षा भिन्न आहे असे म्हणता येणार नाही· तरीदेखील "ग्रामीण" व "प्रादेशिक" हे सर्वस्वी एकच आहे असेही म्हणता येत नाही· कारण त्या दोन्ही साहित्यांच्या आविष्कार वैशिष्टयांचे तथा घटकतत्त्वांचे आविष्करण गुणधर्म भिन्न आहेत असे म्हटले जाते· म्हणजेच प्रादेशिक साहित्याची सर्व घटकतत्त्वे ही स्वतःचे असे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व घेऊन साहित्यात अवतरतात· याहीपेक्षा समूहकेंद्रितता हे प्रादेशिक साहित्याचे महत्त्वाचे वैशिष्टय ठरते· परंतु ग्रामीण साहित्याच्या बाबतीत हे समीकरण ग्राहय धरता येईलच असे नाही· तरीही ग्रामीण साहित्याने हे समीकरण अंगीकारल्यास, त्याला "प्रादेशिक" हे विशेषण प्राप्त होऊ शकेल· तथापी जे "ग्रामीण" असते ते "प्रादेशिक" असतेच कारण प्रदेश विशिष्टतेचे काही गुणविशेष त्याला लाभलेले असतात· अर्थात हे गुणविशेष त्या साहित्याने आणि लेखकाने कितपत स्विकारले आहेत यावरूनही त्याचा प्रादेशिक म्हणून दर्जा ठरवला जातो· ज्या ग्रामीण वाड्मयामध्ये त्या त्या प्रदेशाची, तेथील लोकजीवनाची प्रकर्षाने चित्रणे केलेली आढळतात तथा ज्या ग्रामीण साहित्यामध्ये त्या प्रदेशाच्या खूणा ठळकपणे प्रतित होतात, त्याला प्रादेशिक हे नामाभिधान प्राप्त होत असते·

वास्तविक विशिष्ट अर्थानं - प्रादेशिक ते ग्रामीणच आणि ग्रामीण तेच प्रादेशिक असते·यावरून ते सर्वस्वी भिन्न आणि सर्वस्वी एकच ठरू शकत नाही·

प्रादेशिकता म्हणजे काय? तर एका विशिष्ट अशा भौगोलिक टप्प्यातील निसर्ग, तेथील संस्कृती - सामूहिकता - सामाजिकता - बोलीभाषा यांसह तेथील जीवननाट्य व समस्या या सा-यांच्या एकत्रित चित्रणातून आकाराला येणारा आविष्कार म्हणजे प्रादेशिकता होय· "एक विशिष्ट असा संपूर्ण प्रदेश" असे म्हणतात, त्या प्रदेशातील प्रदेशनिहाय सारे काही आले असा अर्थ अभिप्रेत असतो· प्रादेशिक घटकांची प्रदेशोन्मुखता हे प्रादेशिक साहित्याचे वैशिष्टय ठरते·

प्रादेशिकतेचा वाङ्मयीन शोध घेताना प्रादेशिकतेबाबतची विविध मते विचारात घ्यावी लागतात. श्री.मा.कुलकर्णी, प्रा.स.शि.भावे, डॉ.नागनाथ कोत्तापल्ले, डॉ.प्रल्हाद वडेर, डॉ.मदन कुलकर्णी इत्यादिकांच्या विविध मतांतून एक प्रमाणित भूमिका पुढे येते, ती अशी - प्रादेशिक साहित्यात येणारा प्रदेश हा मुख्यतः ग्रामीण असतो. त्यात येणारी संस्कृती ही सुध्दा विशिष्ट अर्थानं ग्रामीणच असते. त्या प्रदेशाला स्वतःची अशी खास वेगळी वैशिष्टये असतात. तेथील "निसर्ग" हे प्रादेशिक साहित्यातील अविभाज्य पात्र ठरते. देश-काल-परिस्थितीला प्रादेशिक साहित्यात महत्त्वाचे स्थान असते. समाज, राष्ट्र, राज्य, संस्कृती तसेच राष्ट्राची धार्मिक-आर्थिक सामाजिक-सांस्कृतिक-राजकीय पार्श्वभूमी आणि परिस्थिती, तसेच आचार-विचार, परंपरा, राहणीमान, रितीरीवाज इत्यादींचा समावेश देशकाल वातावरणात होतो. समूह केंद्रितता हा प्रादेशिक साहित्याचा महत्त्वाचा विशेष ठरतो. "ग्रामीण" आणि "प्रादेशिक" यांच्या प्रकृती वैशिष्टयांचे तथा घटक तत्त्वांचे आविष्करण गुणधर्म भिन्न आहेत. इत्यादी.

नंतर, प्रादेशिकतेमुळे साहित्याला लाभणारा वेगळेपणा पाहण्यापूर्वी, "प्रादेशिकतेमुळे साहित्याला वेगळेपणा लाभतो का? असा प्रश्न उभा राहतो. तथापी या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी असल्याचे दिसून येते. कारण, प्रादेशिकतेचा आविष्कार घडवण्यास साहयभूत ठरणारी प्रादेशिकतेची घटकतत्त्वे ही स्वतःच्या अशा खास वेगळ्या आणि स्वंयभू व्यक्तिमत्त्वाचा वेगळा ठसा, त्या कलाकृतीवर कमी-अधिक प्रमाणात उमटवितातच. आणि या स्वतःच्या अशा वेगळ्या व्यक्तिमत्त्वाने युक्त असणा-या घटकतत्त्वांनी मिळून प्रादेशिकता सिध्द होते. म्हणूनच प्रादेशिकतेमुळे साहित्याला प्रदेशपुरस्सर वेगळेपणा लाभतो, हे नाकारता येत नाही.

लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावर या प्रादेशिकतेचा कोणता परिणाम होतो अगर तो कस-कसा होतो? हे पाहताना तो दोन प्रकारे होतो, असे दिसून येते. त्यापैकी 1. प्रदेशपुरस्सर परिस्थितीचा आणि जाणीवेचा अपरिहार्य ठसा अगर संस्कार लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावर झालेले असतात, हे प्रथम गृहीत धरावे लागते.

तथापी 2· प्रदेशपुरस्सर प्रादेशिकतेची घटकतत्त्वे लेखकाला स्विकारावी लागतात· म्हणजेच प्रदेशविशिष्ट प्रादेशिकतेची प्रदेशपुरस्सर जाण लेखकाला स्वतःच्या व्यक्तिमत्त्वावर लादून घ्यावी लागते· म्हणजेच प्रादेशिक विशिष्टतेशी लेखकाला अवास्तव विसंगत राहून चालत नाही, हेही खरेच·

साहित्यातील किंवा ग्रामीण साहित्यातील प्रादेशिकता थोडी गौण तथा दुय्यम ठरते· त्यामुळेच ते वाड्‌मयीन मुल्य होऊ शकत नाही असेच म्हणावे लागते· पण मग, तिची वेगळी संकल्पना मानण्याची गरजच काय? असाही प्रश्न निर्माण होतो· परंतु वेगळ्या वाड्‌मयीन प्रवृत्तीची वेगळी जाण सुस्थित प्रस्थापित करण्यासाठी, तिची वेगळी संकल्पना मान्य करण्यात आल्याचे दिसून येते· किंबहुना - साध्यापेक्षा साधनाला अधिक महत्त्व असत नाही· परंतु साधनाला महत्त्वच नाही असे मात्र नाही, तर साध्यापेक्षा ते थोडे कमी असते· साध्य साधणारे साधन हे काही कमी महत्त्वाचे नसते· तरीही अंतिमसाध्य साधल्यानंतर साधनाकडे थोडे दुर्लक्ष होणे स्वाभाविकच| तेणेकरून प्रादेशिकता हे कलाकृतीचे साधन आणि अनुभवाची सिध्दता हे अंतिम साध्य होय· अंतिम साध्याहून "साधन" हे केव्हाही गौणच, दुय्यमच ठरते· मात्र ते दुय्यम असल्या कारणाने श्रेष्ठ ठरत नसले तरी, अनन्यसाधारण ठरते एवढे मात्र निश्चित· अर्थातच, साहित्यातील तथा ग्रामीण साहित्यातील प्रादेशिकता हे स्वतंत्र वाड्‌मयीन मुल्य होऊ शकत नाही, तर आपल्या खास वेगळ्या अशा घटकतत्त्वांची आणि आविष्कार लक्षणांची वेगळी सांगता करणारी ती एक वाड्‌मयीन प्रवृत्ती आहे·

यानंतर, द·ता·भोसले यांचा परिचय करून देत असताना विशेषत्त्वाने ग्रामीण साहित्यिक तथा लेखक म्हणूनच ते मराठी साहित्यक्षेत्राला परिचित असल्याचे दिसून येते· विनोद हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचाच एक अविभाज्य भाग असल्याने, त्यांना विनोदी साहित्यलेखनात विशेष यश मिळाले असेच म्हणावे लागेल· कथेबरोबरच त्यांनी कादंबरी, नाटक, चरित्र आणि समीक्षा लेखनही केल्याचे दिसून येते· तरीसुध्दा ग्रामीण साहित्य विश्वात "ग्रामीण कथाकार" म्हणूनच त्यांचे स्थान निश्चित झालेले

दिसते· 1960 नंतर कथालेखन करणा-या प्रयोगक्षम आणि कलासंपन्न अशा कथाकारात त्यांची गणना होऊ शकते· ग्रामीण अनुभूतीची आणि ग्रामीण जीवनाची अस्सल स्पंदने जागृत करणा-या डॉ·आनंद यादव यांच्या कथेशी भोसल्यांची कथा जवळ जाताना दिसते·

त्यांच्या कथेला प्रादेशिकतेच्या छटा असल्याचे दिसून येते· संपूर्ण सांगोला परिसर आपल्या प्रदेश वैशिष्टयांनिशी त्यांच्या कथांतून उभा राहताना दिसतो· अस्सल ग्रामीण जाण ;, देशी वाण, सहजता आणि स्वाभाविकता हेच त्यांच्या कथांचे वैशिष्टय ठरते· मानवी मनातील गुंतागुंत आंदोलनांचा सहज नि स्वाभाविक अर्थ शोधण्याकडे त्यांच्या कथांचा अधिक कल दिसतो· म्हणूनच त्यांची कथा ही आत्मीक पातळीवर उदात्त आणि स्वाभाविकही होताना दिसते· काही अंशी त्यांचा पिंड हा सर्जक आणि तत्त्वचिंतनात्मक , म्हणजेच जातीवंत समीक्षकाचा दिसून येतो· यादृष्टीनेच त्यांच्या कथाही अधिक सर्जक आणि तत्त्वचिंतनात्मक पातळीवर परिणाम साधताना दिसतात· यातूनच त्यांची कथा प्रौढ आणि परिपक्व होताना दिसते· प्रादेशिकता हा त्यांच्या कथांचा एक अविभाज्य भाग ठरतो· यामुळेच त्यांच्या कथाना प्रादेशिकतेचे अंग आहे, असे म्हणणे उचित ठरते· प्रादेशिकतेच्या अनुरोधानेच त्यांची कथा ही आवश्यकतेनुसार प्राथमिक पातळीपासून कलात्मक पातळीपर्यंत अनेकविध स्वरूपाचे प्रादेशिक परिणाम साधताना दिसते· म्हणूनच त्यांच्या कथेला कलात्मक उंची प्राप्त झाल्याचे दिसते· एवढेच नव्हेतर तिला स्वाभाविक जीवनदर्शनाचे प्रादेशिक परिमाण लाभल्याचे दिसते· त्याचप्रमाणे कथावाङ्मयाच्या विकासाच्या दृष्टीने त्यांची कथा ही अधिक कलात्मक, संपन्न आणि समृध्द झाल्याचे दिसून येते·

त्यांच्या "अगं अगं म्हशी" आणि "पाऊस" या दोन कथासंग्रहांच्या अनुषंगाने त्यांच्या कथेतील प्रादेशिकतेचा अभ्यास तथा विश्लेषण करता येते· हे विश्लेषण करत असतानाच मराठी ग्रामीण कथालेखनाच्या तथा प्रादेशिक कथालेखनाच्या संदर्भात त्यांचे लेखनकर्तृत्व लक्षणीय आहे याची साक्ष पटते· त्यांच्या "अगं अगं म्हशी" या कथासंग्रहाने "प्रादेशिक जीवनाचे" वेगळे क्षितिज शोधण्याचा प्रयत्न

केला आहे. आणि प्रादेशिक जीवनातील विनोदाचा आनंददायी आविष्कार घडवण्यात त्यांना यश आलेले आहे. या कथासंग्रहातील कथालेखनाचा बाज ग्रामीण विनोदी ढंगाचा आहे, तसेच त्याला प्रादेशिकतेचे अंग आहे. सांगोला परिसरातील शेतकी प्रदेश जीवनाशी तसेच प्रादेशिक जीवनाशी बांधल्या गेलेल्या सामान्य-अतिसामान्य लोकांच्या जीवनातील साधे साधे प्रसंग, त्यांनी विनोदाच्या साहयाने बोलते केले आहेत.

तर "पाऊस" या कथासंग्रहातूनही "प्रादेशिक जीवनाशी" बांधल्या गेलेल्या सामान्य व अतिसामान्य माणसांच्या जीवनातील दुःख, दैन्य, दारिद्रय, हालअपेष्टा आणि उपासमार अधिक्याने चित्रित झाले आहे.

विशेषत्वाने त्यांच्या कथासाहित्यातून ग्रामीण पदेश जीवनाशी संलग्न असणा-या लोकांच्या जीवनातील साधे-साधे प्रसंग, तसेच ग्रामीण प्रदेशातील शेतकी जीवनाच्या सुखदुःखाचे चित्रण, ग्रामीण जीवनावर होणारा राजकारणाचा व नव विचारांचा इष्ट अनिष्ट परिणाम, दलितांच्या आणि झोपडवाशीयांच्या उपेक्षीत जीवनाचे चित्रण आणि येणेप्रमाणेच प्रादेशिक जीवनाशी बांधल्या गेलेल्या इतरही लोकांच्या जीवनाचे चित्रण इत्यादींचा अंतर्भाव त्यांच्या कथासाहित्यात आढळतो. यादृष्टीनेच त्यांच्या "अगं अगं म्हशी" आणि "पाऊस" या दोन कथासंग्रहातील कथांचे आशय-विषय दृष्टया विभाजन व कथासार चर्चा करता येते. यातूनच त्यांच्या कथा-विषयात आणि आशयात वैविध्य असल्याचे दिसून येते.

द.ता.भोसले यांच्या कथेतील प्रादेशिकतेचे स्वरूप पाहताना, त्यांच्या कथांतून सांगोला (पंढरपूर) परिसरातील प्रादेशिकतेची घटकतत्त्वे प्रदेशोन्मुख होऊन आल्याचे दिसून येते. या प्रदेशपुरस्सर घटक तत्त्वांच्या शक्य तितक्या आविष्कारातून प्रादेशिकतेचे स्वरूप स्पष्ट होत जाते. अर्थातच त्यांच्या कथातून आलेल्या - भौगोलिकता, निसर्ग, संस्कृती, सामुहिकता, सामाजिकता, बोलीभाषा आणि जीवननाट्य व समस्या इतयादी घटक तत्त्वांमधून सांगोला (पंढरपूर) परिसरातील प्रादेशिकता

ध्वनित होताना दिसते· या घटकतत्त्वांतून प्रतित होणारे तेथील प्रकृतीमान, जीवनमान, जीवनधारणा, समाजधारणा, लोकसंकेत, लोकरूढी इत्यादींच्या स्वरूपाप्रमाणेच भोसल्यांच्या कथेतील (तथा सांगोला परिसरातील) प्रादेशिकतेचे स्वरूप आहे·

प्रादेशिक साहित्यात प्रादेशिकतेची सर्वच घटकतत्त्वे साकल्याने सारख्याच प्रमाणात आविर्भूत व्हावीत असे म्हणता येत नाही· तरीही या घटकतत्त्वांच्या शक्य तितक्या प्रमाणातील आविष्करणातून प्रादेशिकतेचा परिणाम साधता येतो याचे भोसल्यांच्या कथा एक उत्तम उदाहरण ठरतात· प्रादेशिकतेबाबतचा पूर्वग्रहदुषीत दृष्टीकोन, भोसल्यांच्या कथेतील प्रादेशिकतेचे स्वरूप पाहताना निवळत जाऊ शकेल अशी आशा वाटते· प्रादेशिकतेतील सर्वात व्यापक पातळीवरचा आणि गडद स्वरूपाचा आविष्कार साधणारे घटकतत्त्व म्हणजे सामाजिकता होय· म्हणूनच भौगोलिकता नि निसर्ग यापेक्षाही त्यांच्या कथांतील प्रादेशिकता ही तेथील सामाजिकतेच्या घटकतत्त्वातून अधिक्याने प्रतित होताना दिसते· एक संपूर्ण प्रदेशच्या प्रदेश साकार करणे हे प्रादेशिक साहित्याचे दुय्यम उद्दिष्टअसते मग तो साकार करताना लेखकाने कुठल्या घटकतत्त्वांना अधिक प्राधान्य दिले हे महत्त्वाचे नाही· फक्त संपूर्ण प्रदेश साकार झाला की पूरे· अर्थातच भोसल्यांच्या कथासाहित्यात हा संपूर्ण प्रदेश (सांगोला परिसर) साकारला आहे· कमी-अधिक प्रमाणात का होईना पण प्रादेशिकतेची सर्व घटकतत्त्वे त्यांच्या कथांतून अवतीर्ण झाली आहेत· त्यांच्या कथेतील सामुहिकतेवर आणि सामाजिकतेवर प्रदेश पुरस्सर परिस्थितीचा प्रभाव असल्याचे जाणवते· त्यामुळे त्यांची एकटी सामुहिकता आणि सामाजिकताही संपूर्ण प्रदेश वैशिष्टये घेऊन साकार झाल्याचे जाणवते· तात्पर्य - त्यांच्या कथेतील प्रादेशिकतेचे स्वरूप हे प्रदेश पुरस्सर वस्तुस्थितीशी नाते सांगणारे आहे, हे नाकारता येण्याजोगे नाही·

प्रादेशिकतेमुळे द·ता·भोसले यांच्या कथासाहित्याला कोणते वेगळेपण लाभते? हे पाहताना - स्वतःच्या अशा खास प्रदेश वैशिष्ट्यांनिशी सिध्द असलेला सांगोला प्रदेश हा त्यांच्या कथासाहित्यावरही स्वतःचा असा वेगळा ठसा उमटवितो· काहीशी दुष्काळग्रस्त पार्श्वभूमी असलेल्या, मूठभरांच्या शेतीव्यवसायाच्या आश्रयानं

वावरणारा प्रादेशिक लोकसमूह त्यांच्या कथांवर दुष्काळाचे नि दुःखाचे दाट सावट पसरताना दिसतो· दाद्रिय, लाचारी, असुरक्षितता, आणि दौर्बल्य यांचा शाप त्या प्रदेश जीवनाला लाभल्याचे दिसते· दारिद्रयाची भीषणता, वेदनेचा थरार, दुःखाची तीव्रता, मनाची गुंतागुंत आंदोलने नि असहायतेतून निर्माण होणारे कारुण्याचे दाट सावट आपली काळी सावली त्यांच्या कथासाहित्यावर पालडत उभे आहे· दुःख, दैन्य, उपेक्षा नि असहायता याना स्वाभाविक जीवंतपण देण्यास त्यांची प्रादेशिक वस्तुस्थिती साहयभूत ठरते· अर्थातच या वस्तुस्थितीदर्शक प्रादेशिकतेचा वेगळा प्रभाव जाणवतो· त्यांच्या प्रदेशाला लाभलेली दुष्काळग्रस्त पार्श्वभूमी, त्यांची आदिमतेकडे झुकलेली संस्कृती आणि तेथील सामाजिकता ही इतर प्रदेशाच्या तुलनेत काही बाबतीत भिन्न ठरते· तेथील लोकसंस्कृतीचे आणि सामाजिकतेचे यथार्थ सूक्ष्म दर्शन घडवण्यासाठी त्यांची प्रादेशिक विशिष्टता तथा प्रादेशिक वस्तुस्थिती उपयुक्त ठरलेली दिसते·

त्यांच्या प्रादेशिक लोकमानसाच्या समस्यांचे नि लोकजीवनाच्या जीवननाट्याच संदर्भ शोधण्यास त्यांची स्वयंसिध्द प्रादेशिकता साहयकारी ठरते· त्यातूनच त्यांच्या कथासाहित्याला वेगळेपणा लाभल्याचे जाणवते· तसेच प्रादेशिक आविष्काराच्या परिणामातून लेखकाच्या अनुभवाला विविध पैलू लाभलेले दिसतात· या पैलूतून एक नवा प्रादेशिक आकृतीबंध, एक नवी जीवन जाणीव, एक नवा आचार सिध्दांत, एक नवे समुहदर्शन आणि एक नवे वाड्मयदर्शन प्रतित होताना दिसते· लेखकाच्या कलापूर्ण प्रादेशिक चित्रणामुळे पात्रांच्या अंगभूत (स्थायी) आणि संस्कारीत वृत्ती-प्रवृत्तींना अधिक अर्थपूर्णता व सूचकता आलेली दिसते·

त्यांच्या "अगं अगं म्हशी" व "पाऊस" या दोन्ही कथासंग्रहातील जवळजवळ सर्वच कथांतून प्रादेशिक विशेषांचा अंतर्भाव असल्याने त्या सर्व कथा प्रादेशिक ठरतात· तरीही प्रादेशिक साहित्याच्या संकल्पनेनुसार फक्त एक-दोन कथाच अप्रादेशिक ठरतात· त्यापैकी "अगं अगं म्हशी" मधील "झोप" ही कथा आणि "पाऊस" मधील "झुंज" ही कथा विशिष्ट अर्थानं अप्रादेशिक ठरते· किंबहुना त्यांत

व्यापक पातळीवरचा अनुभवाचा आविष्कारच अधिक गडद झाल्याने प्रादेशिकतेच्या खूणा कुठेच आढळत नाहीत. तथापी "पाऊस", "बाजार", "अनावर" यासारख्या आणखी काही कथा वरकरणी अप्रादेशिक वाटतात. परंतु प्रादेशिकतेची शक्य तेवढी घटकतत्त्वे त्यांनी स्विकारल्याने त्या अप्रादेशिक ठरत नाहीत. भोसल्यांच्या कथेतील प्रादेशिक वेगळेपण ठळकपणे जाणवत नाही. कारण त्यांच्या सांगोला परिसराशी अनेक बाबतीत जवळीक साधू पाहणारा सातारा हाही परिसर आहे. सातारा व सांगोला परिसरातील संस्कृतीत भेदांपेक्षा साम्यच अधिक आहे असे दिसून येते. त्यामुळेच त्यांच्या प्रदेशाला व्यापक रूप प्राप्त होते. त्यांच्या कथेत दोषांपेक्षा गुणच अधिक आढळतात. (यातूनच त्यांची कथा ही अकृत्रिम आणि स्वाभाविक असल्याचे दिसून येते. )